# पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

---

## प्रेसनोट

## पीएमपीएमएल च्या मुख्य प्रशासकीय कार्यालयात मतदान जागृती कार्यक्रम

➢ **परिवहन महामंडळाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी घेतली मतदान करण्याची प्रतिज्ञा.**

विधानसभा निवडणुकीत जास्तीत जास्त मतदारांनी मतदानाचा हक्क बजावून आपला सहभाग नोंदवावा यासाठी मा. मुख्य निवडणूक अधिकारी महाराष्ट्र राज्य यांनी मतदान जागृती कार्यक्रम घेण्याचे निर्देश दिले आहेत. त्यास अनुसरून पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत दि. ३० ऑक्टोबर २०२४ रोजी मतदान जागृती कार्यक्रमांतर्गत मतदान प्रतिज्ञा घेण्यात आली.

परिवहन महामंडळाच्या मुख्य प्रशासकीय कार्यालयात अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालिका मा. दिपा मुधोळ – मुंडे, सहव्यवस्थापकीय संचालक मा. श्री. नितीन नार्वेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी मा. प्रज्ञा पोतदार-पवार यांच्यासह सर्व खातेप्रमुख, विभागप्रमुख व कर्मचाऱ्यांनी मतदानाचा हक्क बजाविण्याचा निर्धार व्यक्त करून मतदानाची प्रतिज्ञा घेतली.

याप्रसंगी पर्वती विधानसभा मतदारसंघातील मतदान जागृती कार्यक्रमाची टीम उपस्थित होती.

---

**"आपला मतदानाचा हक्क बजावून आपण सर्वांनी लोकशाहीच्या महोत्सवामध्ये सहभागी होऊया. तसेच जास्तीत जास्त मतदारांनी मतदान प्रक्रियेमध्ये सहभाग नोंदवावा यासाठी आपण आपले कुटुंबातील सदस्य, नातेवाईक व मित्रमंडळी यांचे पुणे महानगर परिवहन महामंडळातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी प्रबोधन करावे."**

--- मा. दिपा मुधोळ – मुंडे, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, पीएमपीएमएल.

---

दि. ३०/१०/२०२४.

मा. संपादक,
दैनिक ..........
यांजकडेस...

महोदय,

वरील प्रेसनोट नागरिकांच्या माहितीसाठी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिद्ध होणेविषयी विनंती आहे.
मा. स. कळावे.

Sd/-
**कामगार व जनता संपर्क अधिकारी**
**पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.**

---